पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ४१

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरूवार दि. २०/१२/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १३५८**

मा.सौ.अलका खाडे, मा.सुनिल टिंगरे, यांचे दि. ११/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड कं. ४ कळस विश्रांतवाडी मधील स.नं. ११७ मधील शाळेसाठी आरक्षित असलेल्या जागेवर म.न.पा. शाळेसाठी नविन इमारत बांधणेकामी मंजूरी घेऊन अर्थसंकल्प २००८-२००९ मध्ये तरतूद करणेबाबत.

**विषय क्र. १३५९**

मा.सौ.अलका खाडे, मा. सुनिल टिंगरे यांचे दि. ११/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी मधील कळस गावठाण ते यशवंत नगरी, गंगाकुंज मार्ग माळवाडी रस्ता पालखी मार्ग म्हणून १२ मीटर (४० फुट) कलम २१० खाली रूंद करण्यात यावा.

**विषय क्र. १३६०**

मा.सौ.अलका खाडे, मा.सुनिल टिंगरे, यांचे दि. ११/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड कं. ४ कळस विश्रांतवाडी मधील कळस गावठाण ते कळस स्मशानभूमी रस्ता कलम २१० खालील ६ मीटर रूंद करण्यात यावा.

**विषय क्र. १३६१**

मा.सौ. संगिता दत्तात्रय गायकवाड यांचे दि. १२/१२/२००७ चे पत्र.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयात दिनांक १६,१७ व १८ जानेवारी २००८ या काळात "Women in Contemporary India An Interdisciplinary Approach" या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केलेले आहे. ही परिषद प्रामुख्याने स्त्रियांचे स्थान निश्चित करणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांचे मुल्यमापन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली आहे. लोकप्रिय साहित्य,चित्रपट, आणि प्रसारमाध्यमे स्त्रियांच्या पारंपारिक भूमिकांचे समर्थन करतात, ज्याचा समाजावर अत्यंतिक प्रभाव दिसून येतो.

स्त्रियांच्या भूमिकेचे निर्धारण करणाऱ्या वर्तमान सामाजिक, सांस्केतिक व आर्थिक शास्त्रीय मुल्यमापन करणे हा या परिषदेचा उद्देश आहे. सामाजिक मूल्यव्यवस्था, साहित्य प्रसारमाध्यमे यांचा वापर करून सामाजिक जाणीवांमध्ये काही बदल घडून आणणे शक्य होईल यासंबंधी अभ्यासकरणे हा देखिल

परिषदेचा महत्वाचा उद्देश आहे. परस्परविरोधी दृष्टीकोनातून एक समान सूर शोधणे व त्याचा सामाजिक सुधारणांसाठी उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करणे हा परिषदेचा मुख्य हेतू आहे.

स्त्रियांच्या सबलीकरणासाठी महापालिकेने योजलेल्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निश्चितच या परिषदेतील निष्कर्षाचे मार्गदर्शन होण्यास मदत होईल. पुणे शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक नावलैकिकात भर पडेल असेच या परिषदेचे स्वरूप आहे. या विधायक शैक्षणिक उपक्रमासाठी निधी संकलन करणे हा महत्वाचा प्रश्न आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे या परिषदेसाठी र.रू.२,००,०००/- लाखाची आर्थिक मदत देण्यात यावी त्यामुळे पुणे शहर व पुणे मनपाचा यातून गौरव होणार आहे. पुणे मनपाने सहप्रायोजकत्व स्विकारावे.

**विषय क्र. १३६२**

मा.संतोष आरडे यांचे दि. १३/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. २० मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणेकरिता रक्कम रू. ७,००,०००/- चे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-११, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे व भूमिगत केबल टाकणे. | | |
| पान क्र. ३००, अ.क्र.२३ , वॉर्ड क्र.२० भूमिगत केबल टाकणे. | ७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. २० मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | ७ लाख |

**विषय क्र. १३६३**

मा.रशिद शेख यांचे दि. १४/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ७५ हरकानगर मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी रक्कम रूपये १९,८०,०००/चे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं ए-१, नवीन पथांची सुधारणा करणे पान क्रं. २३६, अ.क्रं.२८, हरकानगर येथे विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | १९.८० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.७५, हरकानगर मध्ये विविध विकासाची कामे करणे. | --- | १९.८० लाख |

**विषय क्र. १३६४**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा. संजय नांदे यांचे दि. १४/१२/२००७ चे पत्र.

श्री सौराष्ट्र स्थानकवासी जैन संघ यांच्या वतीने १५ दिवसाच्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम जैन समाजाचे धर्मगुरू पुज्यश्री नम्रमुनी महाराज साहेब तसेच आदरणीय

गुरूमैया पुज्यश्री प्रितीसुधाजी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाला पुण्यातील सर्व जैन संस्थांना सदर संस्थेने आमंत्रित केले आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर भक्तगण उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमास श्री सौराष्ट्र स्थानकवासी जैन संघास दि.६/४/२००८, दि.१३/४/२००८, दि.१८/४/२००८ असे तीन दिवस सकाळी ८ ते दुपारी १.०० या कालावधीसाठी श्री गणेश कला क्रिडाची आवश्यकता आहे. त्याचे हे सर्व कार्यक्रम हे संपूर्ण मोफत्त आहेत.

तरी श्री सौराष्ट्र स्थानकवासी जैन संघास वर उल्लेख केलेल्या दिनांकास व कालावधीसाठी श्री गणेश कला क्रिडा केंद्र खास बाब म्हणून नाममात्र दराने देण्यात यावे.

**विषय क्र. १३६५**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता, उज्ज्वल केसकर यांचे दि. १४/१२/२००७ चे पत्र.

श्री. भास्कर काळूराम जाधव हे नगरसचिव कार्यालयाकडे गेली २२ वर्षे बिगारी या हुद्दयावर बिगारी म्हणून काम करीत आहेत.

तरी नगरसचिव कार्यालयाकडील एक बिगारी जागा कमी करून शिपाई या पदाची एक जागा वाढविण्यात यावी व त्या जागेवर श्री. भास्कर जाधव यांची शिपाई या हुद्दयावर नेमणूक करण्यात यावी.

**विषय क्र. १३६६**

मा.सौ. दिपाली धुमाळ यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं १०९ वारजे शिल्पा फौंडेशन हॉस्पिटल ते डी.पी. रस्ता पर्यंत ग्राऊट करणेसाठी र.रू. १०,००,०००/- तसेच वॉर्ड क्र.१०९ वारजे आकाशनगर सुत्रम विश्व परिसर मधील रस्ता डांबरीकरण करणेसाठी र.रू.५,००,०००/- अशी एकूण रक्कम १५,००,०००/-चे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं एस-३२,शहरात विविध ठिकाणी नवीन पूल बांधणे व पुलांची दुरूस्ती करणे. | | |
| पान कं २९८, अनुक्रमांक ४, वॉर्ड क्रं. १०९, वारजे जकात नाका ते हायवे पेट्रोल पंप कॅनॉल लगत ओढ्यावर पुल बांधणे. | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १. वॉर्ड क्र.१०९, वारजे शिल्पा फौंडेशन हॉस्पिटल ते डी.पी.रस्ता पर्यंत रस्ता ग्राऊट करणे. | --- | १० लाख |
| २. वॉर्ड क्रं.१०९ वारजे आकाशनगर सुत्रम विश्व परिसर मधील रस्ता डांबरीकरण करणे. | --- | ५ लाख |

**विषय क्र. १३६७**

मा.सौ. दिपाली धुमाळ यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं १०९ वारजे शिल्पा फौंडेशन मुख्यरस्ता व वृदांवन पार्क व मोतीराम नगर मधील रस्ता पेव्हरने डांबरीकरण करणेकरिता रक्कम रू.१५,००,०००/-चे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं एस-३२,शहरात विविध ठिकाणी नवीन पूल बांधणे व पुलांची दुरूस्ती करणे. | | |
| पान कं २९८, अनुक्रमांक ५, वॉर्ड क्रं. १०९, मराठवाडा मित्र मंडळ लगत असलेल्या ओढ्यावर आर सी सी कल्व्हर्ट बांधणे. | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र.१०९, वारजे शिल्पा फौंडेशन मुख्य रस्ता व वृंदावन पार्क व मोतीराम नगर मधील रस्ता पेव्हरने डांबरीकरण करणे. | --- | १५ लाख |

**विषय क्र. १३६८**

मा.वसंत मोरे यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १४१ मधील खालील कामे करणेकरिता र.रू.२०,००,०००/-चे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक,७-रूग्णालये, प्रसुतीगृहे व औषधालये, पान क्र. १४२, अ.क्र. ३४, शहरात दवाखाने व रूग्णालयामध्ये विकासाची कामे करणे.(यादी क्रं.एस-२५) पान क्रं. २७६ अनुक्रमांक ११, वॉर्ड क्रं.१४१ कात्रज येथे बहुउद्येशिय दुमजली आधुनिक दवाखाना बांधणे. | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १. वॉर्ड क्र. १४१, कात्रजगांव येथील गुजरवाडी फाटा वरखडेनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| २. वॉर्ड क्रं. १४१ कात्रज कोंढवा रोड येथील राऊत सोसायटी येथे विविध ठिकाणी रस्ते खडीकरण करून पेव्हरने डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १३६९**

मा. विकास मठकरी, विरोधी पक्षनेता, मा. सुनिल कांबळे, मा. शाम देशपांडे, मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) केंद्र, पुणे व्दारा राज्यातील शल्यचिकित्सकांची परिषद २४ फेब्रुवारी २००८ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे होणार आहे.

परिषदेचे उद्‌घाटन राज्याचे मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेस राज्यातून १ हजार पेक्षा अधिक शल्यचिकित्सक उपस्थित राहणार आहेत.

या शिक्षण आणि आरोग्यविषयक उपक्रमासाठी पुणे मनपाने सहप्रायोजकत्व स्विकारावे तसेच या परिषदेसाठी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह व परिसर संबंधीत संस्थेला विनाशुल्क देण्यात यावे.

**विषय क्र. १३७०**

मा.उज्ज्वल केसकर, यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र तसेच मा.प्रा.विकास मठकरी, विरोधी पक्षनेते, मा.उज्ज्वल केसकर, मा. रविंद्र धंगेकर, मा. सुनिल कांबळे, यांचे दि. १५/१२/२००७ चे पत्र.

विषय क्रं.१३५४, ठराव क्र. १३५८ दि. १४/१२/२००७ (पुणे शहरातील उड्डाणपूलाला पैसे देण्याबाबत) चा फेरविचार करून मूळ विषयपत्र दप्तरी दाखल करावे.

**विषय क्र. १३७१**

मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. १७/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२ मधील खालील कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक,यादी क्रं डी-३शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी (पानक्रं.५४, अ.कं.२) २ गटारे व नाले २ मुख्य मलनि:सारण मुख्य तपासकुंड, मुख्य मलनि:सारण नलिका मलनिसंदर्भ कामे करणे(१) शहरातील नागझरी नाले सुधरण्यासाठी वॉर्ड क्रं १२ पुणे नगर रोड पासून सेमिनरी ते हरी नगर पुलापर्यंत संरक्षण भिंत/फेन्सींग करणे व तदनुंषगिक कामे करणे. | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १. महाविरनगर ते संपर्क कार्यालयापर्यंत १२ इंची पाण्याची लाईन टाकणे. | --- | १५ लाख |
| २.पंपीगस्टेशन ते रामवाडी गावा पर्यंत ६ इंची पाण्याची लाईन टाकणे. | --- | १० लाख |
| ३. वॉर्ड क्रं. १२ येथे पावसाळी चॅनेलायझेशन करणे. | --- | १५ लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. १३७२**

दि. ०३/१२/२००७ ते दि. ९/१२/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/८८२ दि. १३/१२/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १३७३**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ४/८/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१)(अ) अनुसरुन दि. १/१२/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/३१३ दि. १३/१२/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १३७४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २८/७/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २४/११/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/३१५ दि. १३/१२/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १३७५**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्रं. ५४६४ दि. १७/१२/२००७ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. १३७६**

सोनावणे हॉस्पिटल येथील नवीन इमारतीचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.संदिप एस. गायकवाड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,९९९.२६/- पेक्षा ४.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,७४,८४९=२२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/८७३ दि. ११/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३७७**

जिल्हा परिषद भुयारी मार्गाची उर्वरीत कामे व भुयारी मार्गा लगतची रस्तारूंदीच्या ताब्यात आलेल्या जागेवर भुयारी मार्गास अनुषंगिक विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.डब्ल्यु. एस. कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,६९,७६,११०/- पेक्षा ६.००% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,८५,९४,६७६.६० अधिक निविदा अटीतील भाव सुत्रानुसार होणाऱ्या संभाव्य रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/वानि/८७४ दि. ११/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३७८**

वॉ.क्रं. १३४ धनकवडी गांव येथील शांतीधाम स्म.भूमी मध्ये विविध सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १६,१०,४२७/- पेक्षा १६.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,५२,७५८.६८/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/८७७ दि. ११/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३७९**

वॉ.क्रं.३२ शाळा क्रं. ९२ बी येथे वर्गखोल्या बांधणे हे कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.एल.डी. राठोड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९८,४७७/- पेक्षा ५.५०% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,०८,३९३=२३

पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/८७८ दि. ११/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८०**

होळकर जलकेंद्र ते विद्यानगर संपवेल पर्यंत १००० मि.मी. व्यासाची एम.एस.रायझिंग मेन लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,२१,३५,३१०.१०/- पेक्षा ४.५०% जास्त) असल्याने त्यांचे कडून र.रुपये ३,३५,८१,३९९=०५ अधिक भाव वाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/प्र/८८० दि. १२/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८१**

पुणे महानगरपालिका हद्दीतील कात्रज-स्वारगेट-हडपसर या मार्गावर बी.आर.टी. पायलट प्रोजेक्टची कामे करणे(भाग-२) हे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.रेल्कॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६७,००,००,०००/- पेक्षा १७.१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७८,४५,७०,०००/- अधिक निविदा अटीतील भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या संभाव्य रक्कमे पर्यंत काम करून घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका यांचे क्र. मआ / जेएनएनयुआरएम /८८१, दि. १३/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८२**

Annual maintainance of traffic signals for the year 2007-2008 in pune city within Pune Municipal Corporation limit कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार CMS Traffic Systems Ltd यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २७,३०,४८४/- पेक्षा १.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २६,९७,१७२.०९५२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र.मआ /वा.नि. /प्र/ ८८७, दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८३**

वॉर्ड क्रं. ९५ स.नं. ४६,५१ उदय इस्टेट या ठिकाणी ४ इंच, ६ इंच व ८ इंची व्यासाची सी.आय पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,५३५/- पेक्षा ०४.५०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,६७,०१४=०७ (उपलब्ध रक्कमे पर्यंत) पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/८८९ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८४**

वॉ.क्रं. ३२ कस्तुरबा वसाहत येथे शाळेच्यावर सांस्कृतिक हॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.दत्तात्रय कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९६,१२३/- पेक्षा ६.९९% जास्त) (तडजोडीने)असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,३५,६५२=०० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/८९० दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८५**

वॉर्ड क्र.१४१ (स.नं. ३३ पार्ट, शाळा क्रं १७२ बी) कात्रज मनपा शाळेवर दुसरा मजला वाढविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.चैतन्य कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१४,९९,६३३/- पेक्षा १८.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,१९,३५१=५९ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/८९१ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८६**

वॉर्ड क्र. १३, स.नं.३,५ यशवंत नगर व साईकृपा सोसा., आदर्शनगर, स.नं.२२ सैनिकवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९८,५९४.५०/- पेक्षा ३.००% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,३८,६३६=६६ अधिक भाव वाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि (प्र.)/८९२ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८७**

शंकरनगर स.नं.८ व यशवंतनगर स.नं. ३८ परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.२४,९७,५८९.८०/- पेक्षा ३.००% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,२२,६६२.११/- अधिक भाव वाढ सुत्रानुसार होणाऱ्या संभाव्य रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि(प्र.)/८९३ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८८**

वॉर्ड क्र.५३ मधील गोखलेनगर, वीर बाजीप्रभू शाळेमागील नाला चॅनलायझेशन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.सी. बी.ओरसे. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१४,९९,६७४/-पेक्षा १४.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,७९२२१.९२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/८९४ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३८९**

राजाराम पाटील नगर, स.नं.६३ येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.पी.खोडदे अ‍ॅन्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९९,५६९/- पेक्षा ३.००% कमी)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३८,७९,५८१=९३ पर्यंत अधिक भाव वाढ सुत्रानुसार काम करून घेण्यास काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि(प्र)/८९५ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९०**

नगर उपअभियंता पथ क्रं.३ यांचे कार्याक्षेत्रातील कर्वे रोड व घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाचे अतंर्गत विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार श्री. रविंद्र मुकुंद माने यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९३,७५,८५१/- पेक्षा २७.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६८,४४, ३७१=२३ पर्यंत अधिक डांबर/स्टिल, सिमेंटचे बाजार भावातील फरकानुसार (वाढ/कपात) अदा करणेसाठी काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/८९६ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९१**

प्रभाग क्रं९ गोल्फ क्लब प्रभागातील जुना आळंदी रस्ता करणे (भाग-ड) नाल्यावर पूल बांधणे व तद्नुषंगीक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी पिलाने डावरे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर्स सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.३०,००,७१८/- पेक्षा ९.९० टक्के कमी )असल्याने त्यांचे कडून रक्कम रू. २७,०३,६४६.९२/- पर्यत करून घेणेस तसेच डांबर,सिमेंट, स्टिल यांचे बाजारभावातील फरक (वाढ/कपात) अदा करणे व त्यांचे बरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क. मआ/पथ/८९७, दि.१५/१२/२००७ चे पत्र

**विषय क्रं. १३९२**

वडगाव झोन अंतर्गत तळजाई टाकी ते कात्रज उद्यान संपवेल पर्यंत १०१६ मि.मी. व्यासाची एम.एस.ग्रॅव्हीटी मेन लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.शोनान इंजिनिअरिंग वर्क्स प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७,२१,५७,६००/- पेक्षा १२.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६,३४,२६,५३०=४० अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु(प्र.)/८९९ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९३**

सातव वस्ती पंढरीनगर, पाटिलबुवा, गुलमोहर सोसा. परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे(२००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे. बी.एन. चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,८१,६३८.३०/- पेक्षा तडजोडीने ३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३८,६२,१८९=१५ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यास व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/मलनि(प्र.)/९०० दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९४**

शुक्रे वस्ती,दामोदर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे(सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.बारटक्के कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९४,९३६/- पेक्षा तडजोडीने ३.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,३५,०८७=९२ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ /मलनि(प्र.)/९०१ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९५**

गणेश पेठ महाराणा प्रताप शाळेच्या मागे नागझरी नाल्यावरील जुनी स्लॅब तोडून नवीन स्लॅब टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे. धोत्रे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६१, १६, ०८३/- पेक्षा ५.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५७८५८१४.५२ पर्यत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/९०२, दि. १७/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९६**

कोंढवा मुख्यरस्ता ज्योती हॉटेल ते मनपा शाळा येथील २० इंची व्यासाची एम.एस. नलिका रस्ता रूंदीकरणाबाहेर हटविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. लक्ष्मी असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १३,४९,७०५.०० पेक्षा ९.२१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,७४,०१२=८३ पर्यंत (उपलब्ध रक्कमे पर्यंत) काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९०३, दि. १७/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९७**

वॉर्ड क्रं. २९, सुतारवाडी मधील रामनदीलगतचा नाला चॅनेलायझेशन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे. कल्पना एंटरप्राईजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,८००/- पेक्षा १५.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,६७,१८१.०२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/९०४ दि.१७/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १३९८**

वारजे येथील तिरूपतीनगर लगत साईशिल्प अपार्टमेंट समोर रिटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडसपैकी ठेकेदार मे.राहूल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २०,९९,३३१/- पेक्षा १८.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७,०५,७०६.४४ पर्यंत व टेंडर कालावधी डांबर/सिमेंट व स्टिल यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसुल करणे यास अधिन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/९०५ दि. १७/१२/२००७ चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्रं. १३९९**

बाणेर स.नं. १० ते १३३ बाणेरमधून बालेवाडीकडे जाणारा मुख्य रस्त्यावरील बॉक्स कल्व्हर्ट रूंद करणे कामी टेंडर्स मागविली असता मे.शिंदे ॲन्ड शिंदे कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. १४,४२,८९४/- पेक्षा १०.८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,८७,०६१=४५ पर्यंत व टेंडर कालावधी डांबर/सिमेंट व स्टिल यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसुल करणे यास अधिन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/८८८ दि. १५/१२/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १४००**

पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व सेवकांना सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/८५२ दि. ७/१२/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४०१**

पुणे महानगरपालिकेतर्फे Consultancy Services for E.R.P. based Solutions या कामाकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ६ निविदांपैकी Price Water House Coopers Pvt.Ltd. यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/८६८ दि. १०/१२/२००७ चे पत्र.

१) सदर कामाकरीता (Consultancy Services for ERP based Solutions) Price Water House Coopers Pvt.Ltd. यांना काम देणेस

२) रक्कम रुपये ३२,५०,५००/- (Consultancy) + ६६,००,०००/-(Project Manager) = ९८,५०,५००/- Price Water House Coopers Pvt.Ltd. यांना अदा करणेस

३) Price Water House Coopers Pvt.Ltd. यांच्याशी निविदा अटीनुसार करारनामा करणेस

४) वरील खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस

सन २००७-०८ आरई११एन१०३, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे, ड.सांख्यिकी व संगणक कार्यालय, ३. विशेष प्रकारचे हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तदनुषंगिक कामे करणे.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४०२**

पुणे मनपाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक या कामासाठी करार पध्दतीने ६ महिने मुदतीसाठी सेवा घेणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७६५ दि. २१/११/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४०३**

श्री.हरुण गफुर सय्यद, मोटार सारथी, व्हेईकल डेपो यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतुन काढुन टाकण्यास **(Removal from Municipal Service)** मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहमआ/से/७८६ दि. २८/११/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४०४**

पुणे शहरात सार्वजनिक स्वच्छता व सार्वजनिक आरोग्यासाठी न्युसन्स डिटेक्शन स्क्रॉडची योजना पुणे शहरात कार्यरत ठेवणे आवश्यक असल्याने पुणे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ७४० दि. १८/९/२००७ हा लोकहिताविरुध्द असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ अन्वये प्राप्त अधिकारात निलंबित करण्यात येत असल्याबाबत नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीएमसी ३००७/१८२१/प्र.क्र.३६०/०७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २६ नोव्हेंबर २००७ विचारासाठी.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १४०५**

पं. जवाहरलाल नेहरू, वासुदेव बळवंत फडके, यशवंतराव चव्हाण, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील, एस.एम.जोशी, स्व. राजीव गांधी, श्री संत गाडगेबाबा यांचे मनपाकडे असणारे , फोटो फ्रेम खराब झाल्याने व काचा फुटल्याने त्यांच्या नव्याने फोटो फ्रेम मे. पूर्वा ट्रेडिंग कंपनी, ४३०/४३१, शुक्रवार पेठ,पुणे यांचे कडून करून घेतले असून त्यांनी र.रू. ४,५२८.१२ चे सादर केलेले बिल खालील बजेट हेडवर खर्ची टाकून रक्कम संबंधितांस अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. नगरसचिव यांचे जा.क्रं.५३५०,दि.११/१२/२००७ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २००७-०८ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे

क. महानगरपालिका १ स्थायी समिती

१. नगरसचिव यांचे कार्यालय

३. संकिर्ण

**विषय क्र. १४०६**

लोहगांव स.नं. १९८/२ पैकी पुणे नगर डी.पी. रस्त्यात बाधित होणाऱ्या रस्ता रूंदीतील क्षेत्र ताब्यात घेण्यास मे. उच्च न्यायालयातील रिट पिटीशनसाठी तडजोड पुरशीस सादर करणे कामी करावयाचा मसूदा सादर करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भू.जिं.)/८७६ दि. ११/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४०७**

बाजारभावाप्रमाणे डी.आय. व सी.आय. पाईपचे दरातील फरक ठेकेदारांस अदा करणेबाब मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/पा.पु./८८५ दि. १४/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १४०८**

कात्रज देहूरोड बाह्यवळण महामार्गावरील पुणे महानगरपालिका हद्दीमधील कात्रज ते बालेवाडी दरम्यानचा दुभाजक, फ्लायओव्हर खालील जागा चौक इ. सुशोभिकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/उद्यान/८९८, दि. १५/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १४०९**

मुख्यलेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत प्रभारी मा.मुख्यलेखा परिक्षक यांचे मुलेप/३२०,दि. १७/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १४१०**

मा. सौ. रेखा टिंगरे यांचे दि. १७/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १ मधील स.नं. ३१ चौधरीनगर या ठिकाणी मुख्य रस्ते डांबरीकरण करणेकरिता र.रू.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-२शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, पान क्र.२३८, अ.क्र. २१, विश्रांतवाडी धानोरी रस्त्यावरील बॉक्स कल्व्हर्ट बांधणे. | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १,मधील स.नं. चौधरीनगर या ठिकाणी मुख्य रस्ते डांबरीकरण करणे. | --- | २५ लाख |

**विषय क्र. १४११**

मा.सौ. शैलेजा खेडेकर, मा.सौ. रेखा टिंगरे यांचे दि. १७/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. २४ मधील विविध ठिकाणीचे रस्ते डांबरीकरण करणेकरिता रक्कम रू.५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, पान क्रं. २५९, अ.क्रं.१, यादी क्र. जी-१, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे. वॉर्ड क्र.२४ स.नं. १६ भोईटेवस्ती येथे इंटरलॉकिंग बसविणे व काँक्रिट करणे. | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. २४ मधील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे. | --- | ५ लाख |

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**